# नियंत्रक, वैध मापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय

शासकीय कुटीर क्र.७, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई – ४०० ०२१.

दुरध्वनी क्र. :- ०२२-२२०४३३५४/२२०४५७०६ फॅक्स क्र.०२२ – २२८८६६६६

Email Add :- dclmms@yahoo.in / dclmms_complaints@yahoo.com

क्र.वैमाशा-१४/ग्राहक आवाहन/नोटीस स्टीकर/२०१५/१४६ दि. ०९ फेब्रूवारी,२०१५

## परिपत्रक

मा.मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचेशी दि.०३/०२/२०१५ रोजी झालेल्या चर्चेमध्ये त्यांनी प्रत्येक दुकानामध्ये ग्राहकांना सदर ठिकाणी वापरात असलेल्या वजन, माप, वजन करण्याचे व मापन करण्याचे उपकरण यांचे विषयी शंका असल्यास वा विक्रेत्यांनी आवेष्टीत वस्तूंची विक्री छापिल किंमतीपेक्षा जास्त दराने केल्यास नेमकी कोणाकडे तक्रार करावी याबाबतची माहिती नसल्यामुळे ग्राहकांची फसवणूक होत असल्याचा मुददा उपस्थित केला.

या संदर्भात प्रत्येक दुकानात ठळक ठिकाणी व दर्शनी भागावर या बाबतची नोटीस वजा स्टिकर प्रदर्शित करावे असे मा.मंत्री महोदयांनी निर्देश दिलेले आहेत. सदर नोटीस/स्टीकर चा नमुना या सोबत जोडण्यात आलेला आहे. आपल्या विभागातील व्यापा-यांच्या संघटनेस याबाबत अवगत करावे. त्याचप्रमाणे ज्या व्यापा-याकडील वजन व मापे निरीक्षकाकडे फेरपडताळणी व मुद्रांकनासाठी सादर करण्यात येतात अशा व्यापा-यांना पडताळणी प्रमाणपत्रासोबत सदरची नोटीस/स्टीकर दयावी व सदर नोटीस/स्टीकर ते दुकानामध्ये ठळक ठिकाणी प्रदर्शित करतील याबाबत त्यांनी नोंद घेतल्याची त्यांची स्वाक्षरी पडताळणी प्रमाणपत्राच्या स्थळ प्रतीवर न चुकता घ्यावी.

(संजय पाण्डेय)
नियंत्रक, वैध मापन शास्त्र,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति,

उप नियंत्रक,
वैध मापन शास्त्र, सर्व विभाग

प्रतिलिपी माहितीसाठी :

१) मा.सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.

२) मा.मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव.

# ग्राहकांना आवाहन

वजन किंवा माप, तसेच विकत घेतलेल्या वस्तूचे वजन-माप-संख्या विषयी शंका असल्यास किंवा आवेष्टीत वस्तूवरील छापील किंमतीपेक्षा जादा दर आकारणी होत असल्यास कृपया वैध मापन शास्त्र यंत्रणा नियंत्रणकक्षाच्या (०२२) २२८८६६६६ या नंबरवर संपर्क करावा.

# APPEAL TO CONSUMER

In case of doubt about weight or measure, quantity of the commodity purchased or if charged more than printed price on package please contact Legal Metrology Organisation control Room on (022) 22886666.